-३११-

अनुसूचित जमातीच्या उमेदवारांचे
जातीचे प्रमाणपत्र तपासण्याबाबत

महाराष्ट्र शासन,
महसूल व वन विभाग,
परिपत्रक क्रमांक बीसीसी १०९२/प्र.क्र.१५३/ई१०
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक: २० एप्रिल १९९२.

पहा :- शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग, क्रमांक सीबीसी-१६८४/२८१८/[२९१]-११, दिनांक २३/१/८५.

परिपत्रक

अनुसूचित जमाती कल्याण समितीच्या १९८८-८९ च्या नवव्या अहवालात केलेल्या शिफारस क्रमांक ६ , परिच्छेद क्रमांक ६.१ नुसार समितीच्या असे निदर्शनास आले आहे की, बहुतेक शासकीय सेवेमध्ये अनुसूचित जमातीचे उमेदवार शासनाच्या सवलतीपासून वंचित होतात आणि इतर लोक या सवलतीचा फायदा घेतात. त्यासाठी अनुसूचित जमातीच्या उमेदवारांची नेमणूक करण्यापूर्वी त्यांचे जातीचे प्रमाणपत्र खरे आहे किंवा काय याची पाहणी करणे अत्यंत आवश्यक आहे. अनुसूचित जमातीच्या ख-या लोकांना शासकीय सवलतीचा फायदा मिळावा याकरिता तलाठी पदावर यापुढे अनुसूचित जमातीच्या उमेदवारांची नेमणूक करण्यापूर्वी त्यांच्या जातीचा दाखला अद्ययावत असल्याबद्दलची तपासणी आदिवासी प्रशिक्षण आणि संशोधन संस्था, पुणे यांच्याकडून करुन घ्यावी आणि तशी खात्री झाल्यावरच उमेदवारांची नेमणूक करावी, तसेंच सध्या तलाठी पदावर कार्यरत असलेल्या अनुसूचित जमातीच्या कर्मचा-यांचे जातीचे दाखले सदर संस्थेकडून तपासून घ्यावेत आणि खोटे दाखले देणा-यांवर ताबडतोब योग्य ती कडक कारवाई करावी व याबाबतची माहिती शासनाला त्वरित सादर करावी.

जिल्हाधिकारी कार्यालय,
रत्नागिरी.
2 April 1992
आस्थापना
शाखा-
प्र. लि. प्र. जिल्हाधिकारी

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

म.कृ.मराठे

[म. कृ. मराठे]
कार्यासन अधिकारी,
महसूल व वन विभाग.

प्रति,
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी [जिल्हाधिकारी मुंबई वगळून]

७५१